सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
पोलीस उप आयुक्त(अभियान),
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१
दूरध्वनी क्र. ०२२-२२६६५९८१८
Email- cp.mum.dcpops@mahapolice.gov.in

दिनांक : ०३/०६/२०२४

# प्रेस नोट

लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दि. ०४/०६/२०२४ रोजी मुंबई शहरामधील ०६ लोकसभा मतदार संघाकरिता ०३ ठिकाणी (वनराई (नेस्को ) - २६, २७, २९, विक्रोळी - २८, शिवडी - ३०, ३१) मतमोजणी होणार असून शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.), मुंबई ह्यांचे देखरेखीखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे.

नमुद ०३ मतमोजणी केंद्राचे बंदोबस्त प्रभारी अधिकारी हे संबंधित प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त असुन त्यांचे नियंत्रणात स्थानिक तसेच बाहेरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे. मतदान केंद्राच्या परिसरातील वाहतूक सुरळीत ठेवण्याकरिता आवश्यक वाहतूक अधिसूचनेसह वाहतूक पोलीस अधिकारी व अंमलदार यांना देखील नेमण्यात आलेले आहेत. मतदान मोजणी दिवशी संपुर्ण मुंबई शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणेकामी आवश्यक ठिकाणी फिक्स पॉईट नेमण्यात आले असुन संवेदनशील ठिकाणी पेट्रोलिंगसुद्धा नियोजित आहे.

तीन मतदान केंद्राच्या ३०० मीटर परिसरामध्ये दिनांक ०२/०६/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. पासुन ते दिनांक ०५/०६/२०२४ रोजी मध्यरात्री १२.०० वा. पर्यंत निवडणूकीच्या संदर्भात गुंतलेला अधिकारी किंवा अशा मतमोजणी केंद्रावर किंवा त्यांचे परिसरात कर्तव्यात गुंतलेल्या कोणत्याही लोकसेवकाशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी फिरणे किंवा कोणत्याही लोकांच्या सभा किंवा गट तयार करण्यास व सामील होण्यास मनाई करण्यात आली असुन सर्व नागरीकांना नमूद मनाई आदेशाचे पालन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

***